RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ८७] शुक्रवार, ऑक्टोबर २४, २०२५/कार्तिक २, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १९३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

### शहर विकास विभाग

### जाहीर सूचना

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये)**

क्रमांक ठामपा/मुख्या-१/शविवि-२९/वियोअंक/१९३६.

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२९७/१३१९/ सी. आर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अमलात आली. तसेच सुधारित विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टीपीएस/१२०१/२७४/ सीआर-२८/२००१/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर झाले असून, दिनांक १४ मे, २००३ पासून योजना अंमलात आली आहे (यापूढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, सेक्टर क्र. ६, मौजे कावेसर येथील वाघबीळ अस्तित्वातील स्मशानभूमी ही नियोजित ४० मी. रुंद रस्त्यामध्ये (ठाणे कोस्टल रोड) बाधित होत आहे. सदर अस्तित्वातील स्मशानभूमीलगत मौजे कावेसर येथील स. क्र.३१४/अ या शासकीय भूखंडाच्या काही भागावर नव्याने स्मशानभूमीचे नियोजन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्तावित करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, मंजूर विकास आराखड्यानुसार उक्त प्रस्तावाधीन भूखंडाचे क्षेत्र हे हरित विभागाने बाधित होत असून, दरम्यानचे काळात शासन निर्णय क्र. टीपीएस-१२२१/ १८१०/ प्र. क्र. १२६/ नवि-१२, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ अन्वये मंजूर विकास योजनेतील मौजे भाईंदरपाडा, मोघरपाडा, वडवली, कावेसर व कोलशेत येथील गावांचे काही क्षेत्र वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट आ.क्र.१ करीता शासनाने फेरबदल मंजूर केलेला आहे. त्यानुसार मौजे कावेसर येथील स.नं. ३१४/अ या भूखंडाचे हरित विभागात समावेश होत असलेले क्षेत्र सदर वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट आ. क्र.१ करीता आरक्षित आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रारूप सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम २६(१) अन्वये दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले असून, प्रारूप सुधारित आराखड्यानुसार प्रस्तावाधीन भूखंडाचे क्षेत्र वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट आ.क्र. २९२ व प्रस्तावित फ्लाय ओव्हर या आरक्षणाने बाधित होत आहे. उक्त स.क्र.३१४/अ या भूखंडापैकी CRZ-II व CRZ बाहेरील सुमारे ४०८४.०० चौ.मी. क्षेत्रावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नव्याने स्मशानभूमी बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच सदर स्मशानभूमी प्रस्तावित करताना प्रारूप सुधारित आराखड्यामध्ये दर्शविल्यानुसार प्रस्तावित फ्लाय ओव्हरची आखणी कायम ठेऊन त्यानुसार मोकळ्या जागेत स्मशानभूमीचे नियोजन केले आहे;

आणि ज्याअर्थी, मंजूर विकास आराखड्यानुसार सेक्टर क्र. ६, मौजे कावेसर येथील स.क्र.३१४/अ या भूखंडावरील वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट आ.क्र.१ या आरक्षणापैकी (CRZ-II व CRZ बाहेरील क्षेत्रावर) ४०८४.०० चौ.मी. क्षेत्राऐवजी स्मशानभूमी असे आरक्षण प्रस्तावित फेरबदल मंजूर विकास योजनेमध्ये दर्शविणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये "उक्त मंजूर विकास योजनेत" फेरबदलाची कार्यवाही करणेस ठाणे महानगरपालिका (प्रशासकीय मान्यता) मा. महासभा ठराव क्र.१२२, दिनांक २४ जून, २०२५ अन्वये मान्यता प्राप्त आहे (यापुढे "उक्त फेरबदल"असे संबोधिले आहे.).

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार "उक्त मंजूर विकास योजनेत" "उक्त फेरबदलाबाबत" आम जनतेच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी ही जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सूचनाफलकावर व खाली नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व *www.thanecity.gov.in* या संकेतस्थळावर आणि महाराष्ट्र शासनाचे **राजपत्रात** प्रसिध्द झाल्यावर सूचनेच्या दिनांकापासून, ३० (तीस) दिवसांच्या आत आपली सूचना/ हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे अथवा *E-mail ID - adtp@thanecity.gov.in* वर सादर करावी.

**संकेतस्थळ :-** *www.thanecity.gov.in*

ठाणे,
दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५.

**संग्राम कानडे,**
सहायक संचालक, नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# THANE MUNICIPAL CORPORATION, THANE
## Town Planning Department

### Notice

(U/s. 37 of Maharashtra Regional & Town Planning Act,1966)

No. TMC Hq-1/ TDD-29/ DPIC/1936.

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been Sanctioned by Government *vide* Notification No. TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, Dt. 4th October, 1999 & came into force from 22nd November, 1999. Also the Development Plan for Excluded Portion (EP) from Revised Development Plan was sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/ UD-12, Dt. 3rd April, 2003 & came into force from 14th May, 2003 (Here in after referred to as "The said Sanctioned Development Plan");

And Whereas, the existing Waghbil cremation ground at Village Kavesar in Sector No. 6 is affected by the proposed 40 mt. wide D.P.road (Thane Coastal Road). The Public Works Department has proposed to develop a new Cremation ground on a part of the Government land bearing S.No.314/A of Village Kavesar (hereinafter referred to as "the said Land");

And Whereas, as per the Sanctioned Development Plan, the said land is affected by the Green Zone and subsequently Govt. *vide* notification No.TPS-1221/1810/CR-126/ UD-12, dt.05/09/2024 has sanctioned the Modification for Water Front Development Res.No.1, which includes the said land.;

And Whereas, the Draft Revised Development Plan for Thane Municipal Corporation area has been published under Section 26(*1*) of Maharashtra Regional Town Plan Act, 1966 on dt.11/10/2024 and as per the Draft Revised Development Plan, the said land is affected by Waterfront Development Res.No.292 and proposed flyover. The Public Work Department has proposed to developed a Cremation ground on an approximately area of 4084.00 sq.mt. (CRZ-II & Non CRZ area) of S.No.314/A at Village Kavesar, while keeps the proposed fly over intact.;

And Whereas, as per Sanctioned Development Plan in Sector No.6 land bearing S.No. 314/A of Village Kavesar, is reserved for Waterfront Development Res.No.1. Part portion of the said land approximately area 4084.00 sq.mt. (CRZ-II & Non CRZ area) is proposed to change this Waterfront Development Res.No.1 to "Cremation Ground" under section 37 of the Maharashtra Regional Town Plan Act, 1966 in "the said Sanctioned Development Plan" (hereinafter referred to as "the said modification"). Hon. General Body of Thane Municipal Corporation *vide* its Resolution No.122, Dt.24/06/2025 has accorded sanctioned for the following the above said procedure of modification.

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out "The said modification in the said Sanctioned Development Plan" and "The said provision in the said regulations" as per the provisions under section 37(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act 1966. The Plan showing "The said modification" is displayed on the notice board in the office of Assistant Director Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation,

"Mahapalika Bhavan", General Arunkumar Vaidya Marg, Chandanvadi, Panchpakhadi, Thane & also published on website mentioned below. Any person who wants to submit his suggestions or objections to the said modification within 30 (Thirty) days from the date of publication of this notice in the news paper, on the website www.thanecity.gov.in and *Maharashtra Government Gazette*, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane or on the Email ID - adtp@thanecity.gov.in

**Web Sit**e - www.thanecity.gov.in

SANGRAM KANADE,
Asst. Director, Town planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
dated : 24th October, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.